466



Exh. 15/B

रे.क.नं. ४३/२०२६.

मे. दिवाणी न्यायाधीशसो, कनिष्ठ स्तर, पेठ वडगांव
यांचे कोर्टात – ....

श्री. आप्पासो दत्तात्रय खोत -- वादी

Order
Read and recorded

विरुध्द

Sd/-
Jt. CJJD, Pethvadgaon

श्री. आनंदा विठोबा यंगारे -- प्रतिवादी

<u>यातील प्रतिवादी नं. १ व २ तर्फे वादीचे दावेस कैफियत व तुर्तातुर्त मनाई अर्जास म्हणणे खालीलप्रमाणे –</u>

NOTARY Adv. NIVAS B BHAKAR ADVOCATE & NOTARY TAL. PANHALA DIST. KOLHAPUR REGD. NO. 16293 Exp. Date 26/01/2030 GOVT. OF INDIA

१. वादीचे दावेतील व तुर्तातुर्त मनाई अर्जातील संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा व रचनात्मक असून तो प्रतिवादी सदर यांना मान्य व कबुल नाही. प्रतिवादी सदर त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

२. वादीचा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज कायदेशीर नाही. कायद्याप्रमाणे चालणेस पात्र नाही. त्यामुळे वादीचा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

३. वादीचा दावा मुदतीत नाही.

४. दावा व तुर्तातूर्त मनाई अर्जातील कलम (१) मधील दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे आहे. दावा मिळकतीचे वर्णन अपुरे

No. of Corrections on this page. Nil

आहे. दावा विषय स्पष्टपणे नमुद नाही. त्यामुळे सी.पी.सी.ऑर्डर ७,रुल ३ प्रमाणे दावा मिळकतीचे वर्णन स्पष्ट नसलेने वादीचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज चालणेस पात्र नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

NOTA... Ad... NIVA... BHAK... ADVOCATE &... TAL. PAN... DIST. KOL... REGD. NO. ... Exp. Da... 26/01/20... GOVT. OF

५. दावा व तुर्तातुर्त मनाई अर्जातील कलम (२) मधील संपुर्ण मजकूर खोटा,चुकीचा व रचनात्मक असून ते प्रतिवादी सदर यांना मान्य व कबुल नाही. प्रतिवादी सदर त्याचा स्पष्ट शब्दात इन्कार करतात.

मुळ सर्व्हे नं. ३८० चे ग.नं. १६१०, १४९१, १४९२, १४९३, १४९४, १४९५, १४९६, १४९७, ८९७, १४८७, १४८५ असे गट नंबर पडलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी हजर केलेल नाही. सर्व गट नंबरचा ९(३) ९(४) चा एकत्रिकरणचा उतारा हजर केलेला नाही. सर्व गट नंबरचा एकत्रित नकाशा हजर केलेला नाही. तसेच सर्व गट नंबर मधील सह हिस्सेदारांना या कामी पक्षकार करणे आवश्यक आहे. सर्व सहहिस्सदारांना पक्षकार न केलेमुळे Non Joinder of Necessary Parties ची बाधा येते, याही कारणास्तव प्रस्तुतचा दावा चालणेस पात्र नाही. त्यामुळे वादीचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर करणेत यावा.

No. of Corrections on this page. Nil

६. दावा व तुर्तातुर्त मनाई अर्जातील कलम (३) मधील संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा व रचनात्मक असून, तो प्रतिवादी सदर यांना मान्य व कबुल नाही. प्रतिवादी त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

यातील प्रतिवादी यांनी स्वतः त्यांच्या गट नंबरची मोजणी केलेली आहे. सदरचे मोजणी वेळी वादी व प्रतिवादी नंबर २ तसेच अमर पांडूरंग घोदे (पंच), सुदर्शन आनंदा यंगारे (पंच), सचिन शिवाजी खोत (सहधारक) भारत महादेव खोत (लगत धारक) हजर होते. सदरची मोजणी ०८/०१/२०२५ इ. रोजी झाली व त्यानंतर ता. २८/०१/२०२५ इ. रोजी हद्दी कायम करुन दिल्या. सदर मोजणीमध्ये प्रतिवादी यांचे मालकीचे गट नं. १६१० मध्ये ग.नं. १६११ व गट नं. १४९१ च्या लगतच्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण केलेचे दाखविले आहे.

सदर गट नं. १६१० ची प्रतिवादीने ता. ०८/०१/२०२५ इ.रोजी मोजणी करुन घेतली व त्याच्या हद्दीच्या खुना भू कर मापक यांनी २८/०१/२०२५ इ. रोजी दाखविल्या त्यामध्ये वादी यांने प्रतिवादी चे मालकीचीचे गट नं. १६१० मध्ये अतिक्रमण केलेचे दिसून आले व त्याचवेळी वादी नं. १ व २ यांनी प्रतिवादीचे क्षेत्रामध्ये अतिक्रमण केलेल्या क्षेत्राचा ताबा ता. २८/०१/२०२५ इ. रोजी प्रतिवादींना दिला आहे. परंतु वादींने अतिक्रमण केलेल्या क्षेत्रामधील ऊसाचे पिक प्रतिवादी यांनी माणुसकीच्या दृष्टीने व पंचासमक्ष ठरलेमुळे उभे असणारे व वादीने केलेले ऊसाचे पिक

No. of Corrections on this page. Nil

वादींला दिलेले आहे. यातील वादी नं. २ श्री. विशाल बापुसो खोत यांने त्यांचे मालकीचे कुंभोज, ता. हातकणंगले, येथील गट नं. १४९१ ची मोजणी ता. २५/०४/२०२५ इ. रोजी करुन घेतली आहे. सदर मोजणीमध्ये वादी नं. ३ यांने त्याचे मालकीचे गट नं. १४९२ मधुन अंदाजे १२-१३ गुंठे वादी नं. १ व २ चे गट नं. १४९१ मध्ये अतिक्रमण केलेचे दिसून येते व तसे मोजणी नकाशामध्ये दाखविले आहे. सदरचे वादी न. १ यांने केलेले अतिक्रमण वादी नं. १ व २ यांनी काढून घेणे आवश्यक आहे व सदरची गोष्ट कायदेशीर आहे असे असतांना तसे न करता वादी नं. १ ते ३ यांनी बेकायदेशीरपणे प्रतिवादी नं. १ व २ यांचे मालकीची गट नं. १६१० मधील वादी नं. १ व २ यांनी केलेले अतिक्रमीत क्षेत्र हडप करण्यासाठी सदरचा बेकायदेशीर दावा दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा वादींचा दावा चालणेस पात्र नाही. त्यामुळे वादींचा सदरचा दावा नामंजूर करणेत यावा.

७. दावां व तुर्तातूर्त मनाई अर्जातील कलम (४) मधील संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा व रचनात्मक असून, तो प्रतिवादी सदर यांना मान्य व कबुल नाही, प्रतिवादी त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

एकत्रीकरणावेळी सर्व्हे नंबरचे गट नंबर झालेले आहेत ते योग्य व बरोबर आहेत. कुंभोज गांवी एकत्रिकरण योजना १९७० साली झाली असून, गेल्या ५५ वर्षात त्याबाबत कोणतीही तक्रार नाही. तसेच वादी यांनीही त्यांचे क्षेत्राबाबत तक्रार केलेली नाही.

No. of Corrections on this page. Nil

NOTARY Adv NIVAS BHAKA ADVOCATE & N TAL. PANH DIST. KOLHA REGD. NO. Exp. Date 26/01/2030 GOVT. OF

वादीचा गट नं. १४९१ क्षेत्र ४० आर इतक्या क्षेत्राचा असून मोजणीवेळी त्याचे क्षेत्र भरुन त्यांने प्रतिवादीचे मालकीचे ग.नं. १६१० मध्ये १२ आर इतक्या क्षेत्रात अतिक्रमण केलेचे दिसून आले. वादी म्हणतो ते ओढे व वगळी हे वादी व प्रतिवादी यांचे गट नंबर मधून जात नाहीत. तसे ते जात असते तर ओढा ओघळीचे क्षेत्र ७/१२ पत्रकी पो.ख. म्हणून दर्शविले असते. परंतु वादी प्रतिवादी यांच्या ७/१२ पत्रकी कांहीही क्षेत्र पोट खराब म्हणून नमुद नाही.

८. दावा व तुर्तातूत मनाई अर्जातील कलम (५) मधील संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा व रचनात्मक असून तो प्रतिवादी सदर यांना मान्य व कबुल नाही. प्रतिवादी सदर त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

सर्व्हे नं. ३८० चे वादीचे दावेतील कलम (२) मध्ये एकूण ११ गट नंबर पडले असे नमुद करतो. परंतु गेल्या ५५ वर्षात एकत्रीकरणाच्या मोजणीबाबत सदर ११ गट नंबर मधील एकाही सह हिस्सेदारांनी तक्रार केलली नाही. त्यामुळे एकत्रिकरणाचा नकाशा सदोष व चुकीचा झाला आहे हे वादीचे कथन पुर्णपणे चुकीचे आहे. वादीने नि।। ३ चे कागद यादी सोबत अ.नं. ४ ला उपसंचालक, भूमी अभिलेख यांचेकडील दिलेला अर्ज चुकीचा, बेकायदेशीर, अपुरा आहे. वादीला एकत्रिकरण योजनेबाबत तक्रार असलेस त्याला दावेत कलम (२) मध्ये नमुद केलेले ११ गट नंबर मधील सर्व सह हिस्सेदारांना पक्षकार करुन अपिल दाखल करावे

No. of Corrections on this page. Nil

लागेल. त्याला फक्त प्रतिवादी विरुध्द तक्रार करता येणर नाही. तसेच सर्व्हे नं. ३८० चे गट नं. झालेनंतर वादींचे मालकीचे गट नंबर १४९१ व १४९२ चे क्षेत्र चुकीचे झालेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने या कामी हजर केलेला नाही. एकत्रीकरणाच्या योजनेमधील चुकीबाबत वादींना दिवाणी न्यायालयात दाद मागता येणार नाही. त्याबाबत त्याला उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर यांचेकडे दाद मागावी लागेल. याही कारणास्तव वादीचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज चालणेस पात्र नाही. त्यामुळेही वादीचा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज नामंजूर करणेत यावा.

९. वादीचे दावेतील व तुर्तातूर्त मनाई अर्जातील कलम (६) मधील संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा व रचनात्मक असून तो प्रतिवादी सदर यांना मान्य व कबुल नाही. प्रतिवादी सदर त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

ग.नं. १६१० ची मोजणी ता. ०८/०१/२०२५ इ. रोजी झालेनंतर सदर मोजणीप्रमाणे २८/०१/२०२५ इ. रोजी हद्दी कायम करुन दिल्या व त्या हद्दीप्रमाणे वादी नं. १ व २ यांनी केलेल्या अतिक्रमीत क्षेत्राचा पंचासमक्ष ताबा २८/०१/२०२५ इ. रोजी प्रतिवादी नं. १ व २ यांनी केलेल्या अतिक्रमीत क्षेत्राचा पंचासमक्ष ताबा २८/०१/२०२५ इ. रोजी प्रतिवादी नं. १ व २

NOTARY ADVOCATE TAL. DIST. REGD. NO. Exp. 26/01/ GOVT. OF
No. of Corrections on this page. Nil

यांनी घेतला आहे व ते क्षेत्र गट नं. १६१० मध्ये प्रतिवादी नं. १ व २ यांनी सामील करुन घेतले आहे. त्यामुळे अतिक्रमीत क्षेत्राचा ताबाच वादी नं. १ व २ यांचेकडे नसलेमुळे प्रतिवादींनी कब्जा घेवू नये म्हणून मनाई मागणेचा व हा दावा दाखल करणेचा वादींना हक्क व अधिकार नाही.

वादी नं. १ व २ यांनी वादी नं. ३ विरुध्द दावा दाखल करणे आवश्यक आहे. कारण वादी नं. ३ ने वादी नं. १ व २ यांचे ग.नं. १४९१ मध्ये १२ ते १३ गुंठे अतिक्रमण केले आहे व ते अतीक्रमण त्यांनी काढून मागणे आवश्यक आहे.

१०. दावा व तुर्तातूर्त मनाई अर्जातील कलम (७) मधील संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा व रचनात्मक असून, तो प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. प्रतिवादी सदर त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात.

गट नं. १६१० ची मोजणी दि. ०८/०१/२०२५ इ. रोजी झाली त्याच्या हद्दी कायम करुन २८/०१/२०२५ इ. रोजी दिल्या त्याच दिवशी वादी यांनी गट नं. १६१० मध्ये १२ गुंठे क्षेत्रात केलेले अतिक्रमण क्षेत्राचा ताबा प्रतिवादी नं. १ व २ यांनी घेतला आहे. परंतु पंचासमक्ष ठरल्यामुळे त्या क्षेत्रामध्ये केलेले ऊसाचे पिक प्रतिवादी नं. १ व २ यांनी वादी नं. १ व २ यांना दिले आहे व ते त्यांनी कापून नेले आहे. सदर अतिक्रमीत क्षेत्र ता. २८/०१/२०२५ पासून प्रतिवादी नं. १ व २ यांचे मालक नात्याने

No. of Corrections on this page. Nil

शांततामय कब्जे वहिवाटीत आहे. त्यामुळे पुन्हा अंगबळाच्या जोरावर प्रतिवादीने १२ गुंठे जमिनीचा कब्जा घेणार असलेचा सांगणेचा प्रश्नच निर्माण होत नाही.

११. दावा व तुर्तातुर्त मनाई अर्जातील कलम (८) मधील अर्जास कारण खोटे, चुकीचे, काल्पनिक आहे. दावेस व तुर्तातूर्त मनाई अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. जे घडले आहे असे लिहीले आहे ते खोटे व चुकीचे आहे.

१२. दावा अर्जी कलम (९,१०,११) मधील मजकुर चुकीचा आहे.

१३. तुर्तातुर्त मनाई अर्जातील कलम (९) मधील मजकुर चुकीचा आहे. भूमी अभिलेख कार्यालयाने मोजणी करुन हद्दीच्या खुना करुन दिलेल्या आहेत. परंतु अलिकडे वादी नं. १ व २ यांनी गट नं. १६१० मध्ये अतिक्रमण केलेने प्रतिवादींनी आपले जमिनीची मोजणी ता. ०५/०१/२०२५ इ. रोजी करुन घेतलेली आहे.

१४. तुर्तातूर्त मनाई अर्जातील कलम (९ ब) मधील मजकूर चुकीचा आहे. वादी नं. १ व २ यांनी प्रतिवादीचे क्षेत्रात अतिक्रमण केले होते.

१५. तुर्तातुर्त मनाई अर्जातील कलम (९ क) मधील मजकूर चुकीचा आहे. तारीख २८/०१/२०२५ रोजी अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा

NO... ADVOCA TAL. DIST. REGD. Exp 26/01 GOVT. O

No. of Corrections on this page. Nil

प्रतिवादीने घेतला आहे. त्यामुळे पुन्हा ताबा घेणेचा प्रश्नच निर्माण होत नाही.

TARY ... NOTARY ... PUR ... 293 ... 30 ... F INDIA

१६. तुर्तातूर्त मनाई अर्जातील कलम (९ ड) मधील मजकूर चुकीचा आहे. वादी हेच आडदांड व गुंड प्रवृत्तीचे आहेत.

१७. तुर्तातुर्त मनाई अर्जातील कलम (९ इ) मधील मजकूर चुकीचा आहे.

१८. तुर्तातूर्त मनाई अर्जातील कलम (९ई) मधील मजकूर चुकीचा आहे. वादी मागतात तशी तुर्तातुर्त मनाई दाद न दिलेस वादीचे कांहीही नुकसान होणार नाही. उलटपक्षी वादी मागतात तशी तुर्तातुर्त मनाई दाद दिलेस प्रतिवादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे.

१९. तुर्तातुर्त मनाई अर्जातील कलम (९ प) मधील मजकूर चुकीचा आहे. प्रथमदर्शनी केस प्रतिवादींचे बाजूने असून प्रतिवादींना या दावेत अंतीम यशाची पुर्ण खात्री आहे.

२०. दावा अर्जी कलम १२ व तुर्तातुर्त मनाई अर्जातील कलम १० मधील वादीच्या सर्व मागण्या, खोट्या, चुकीच्या अवाजवी व बेकायदेशीर आहेत, त्या प्रतिवादी सदर यांना मान्य व कबुल नाहीत. वादीच्या सर्व मागण्या नामंजूर करणेत याव्यात.

No. of Corrections on this page. Nil

२१. **सबब, प्रतिवादी नं. १ व २ यांची नम्र विनंती की, –**

अ) वादीचा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

ब) जरुर तर कैफियत व म्हणणे दुरुस्तीस परवानगी असावी.

क) अन्य ते न्याय हुकुम याच कामी प्रतिवादीचे वतीने व्हावेत.

येणेप्रमाणे कैफियत व म्हणणे असे.

पेठ वडगांव.

दिनांक : ०९/०३/२०२६.

प्रतिवादी नं.

१) स.नि.डा.हा.अं.सौ./श्री. आनंदा विठोबा यंगारे यांचे असे दस्तूर.
Adv. P. R. Patil

२) सि. वि. यंगारे.

**– प्रतिज्ञा –**

आम्ही यातील प्रतिवादी अशी प्रतिज्ञा करतो की, वरील कैफियती मधील व म्हणणेतील संपुर्ण मजकूर आमचे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्य प्रतिज्ञा आज मु।। कोल्हापूर

दिनांक : ०९/०३/२०२६.

प्रतिवादी नं.

१) स.नि.डा.हा.अं.सौ./श्री. आनंदा विठोबा यंगारे यांचे असे दस्तूर.
Adv. P. R. Patil

No. of Corrections on this page. Nil

२) सि. वि. यंगारे.

## – ॲफिडेव्हीट –

मी, यातील प्रतिवादी नं. २ श्री. सिध्दाप्पा विठोबा यंगारे, व.व.४८, धंदा – शेती, रा. कुंभोज, ता. हातकणंगले, जिल्हा – कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की, वरील कैफियती मधील व म्हणणेतील संपुर्ण मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट आज मु।। कोल्हापूर

दिनांक : ०९/०३/२०२६. ॲफिडेव्हीट करणार

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो. सि. वि. यंगारे.

ॲड. आर.बी. पाटील(साळशीकर)

NOTARY Adv. NIVAS B. BHAKARE ADVOCATE & NOTARY Tal. PANHALA, DIST. KOLHAPUR REGD. No. 16293 Exp. 26/01/2030 GOVT OF INDIA

NOTARY Adv. NIVAS B. BHAKARE ADVOCATE & NOTARY TAL. PANHALA, DIST. KOLHAPUR REGD. NO. 16293 Exp. Date 26/01/2030 GOVT. OF INDIA

NOTARIAL

## – प्रतिज्ञा

मी, यातील प्रतिवादी नं. २ श्री. सिध्दाप्पा विठोबा यंगारे, व.व.४८, धंदा – शेती, रा. कुंभोज, ता. हातकणंगले, जिल्हा – कोल्हापूर अशी प्रतिज्ञा करतो की, वरील ॲफिडेव्हीट मधील कैफियत व म्हणणेतील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्य प्रतिज्ञा आज मु।। कोल्हापूर.

दिनांक : ०९/०३/२०२६ सि. वि. यंगारे.

SOLEMNLY affirmed before me
by सिद्धाप्पा विठोबा यंगारे रा. कुंभोज, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर
Who is identified before me
by स ॲड. आर.बी.पाटील
Whom I personally know
This 09 day of 03/2026

9 MAR 2026

No. of Corrections on this page. Nil.
Notary Regi. Sr. No. 466/2026.

9/3/26
NIVAS B. BHAKARE
Advocate & Notary
Mitharwadi, Post. Ambavade
Tal. Panhala, Dist. Kolhapur.